लोकमत Hello सातारा

# ‘आरती’ने केली आदिवासी भागात ‘ऊर्जाक्रांती’

- आश्रमशाळात धुरमुक्त चुली
- वाचविली कोट्यवधींची जैवविविधता
- ऊर्जाबचतीबरोबरच वेळेची बचत

**मोहन मस्कर-पाटील** |
दि. १९ (सातारा)

**फलटण** येथील ‘आरती’ संस्थेने जव्हार, डहाणू, मोखाडा, सटाणा तालुक्यांतील आश्रमशाळा आणि अंगणवाडीत ‘कम्युनिटी कूक स्टोव्ह’चा उपक्रम राबवून अनोखी ‘ऊर्जाक्रांती’ केली आहे. परिणामी गेल्या काही वर्षांत लाखो झाडे तुटण्यापासून वाचविली आणि धुरमुक्त चुली तसेच शाश्वत ऊर्जास्त्रोताचा नवा पर्यायही उपलब्ध करून दिला. राज्यातील आदिवासी भागातील शाळा, अंगणवाडी तसेच मोठ्या निवासी शाळा ‘आरती’च्या संपर्कात असून त्यांनीही अशाप्रकारचे ‘कम्युनिटी कूक स्टोव्ह’ बसविण्याची तयारी सुरू केली आहे.

‘ॲप्रोप्रिएट रुरल टेक्नॉलजी इन्स्टिट्यूट’ तथा ‘आरती’ ही संस्था डॉ. आनंद कर्वे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १९९६ मध्ये स्थापन केली. सध्या आर. डी. हणबर-देशमुख अध्यक्ष आहेत. ‘आरती’ने दुर्गम भागात ऊर्जानिर्मिती आणि पर्यावरण संतुलनात योगदान दिले असून केंद्र सरकारच्या सहकार्याने आदिवासी आश्रमशाळा, अंगणवाडीसाठी विशेष प्रकारची धुरमुक्त चुलीची तीन मॉडेल तयार केली आहेत. यापैकी ठाणे जिल्ह्यात जव्हार, मोखाडा येथील ५० तर डहाणू २ आणि नाशिक जिल्ह्यातील सटाणा येथे एका आश्रमशाळेत दोन भांड्याची ‘लक्ष्मी १५०’ आणि ‘खवा चूल’ बसविली. अंगणवाडीसाठी साठी एक भांड्याची ‘गृहलक्ष्मी ५०’ चूल बसविली.

‘आरती’ने यासाठी आदिवासी भागात २० लोकांना चूल बनविण्याचे प्रशिक्षण दिले आणि बसवूनही दिल्या. एका चुलीला दहा हजार खर्च जरी आला असला तरी बचत मात्र कोटींची झाली आहे. त्याला कारणेही तशीच आहेत. त्याचा फायदा आजमितीस शेकडो आश्रमशाळा, अंगणवाडी आणि शाळात होऊ लागला आहे. अल्पावधीत शेकडो विद्यार्थ्यांचे जेवण आणि पर्यावरण रक्षण होत असल्याने ‘कम्युनिटी कूक स्टोव्ह’ उपयुक्त ठरू लागला आहे.

एका आदिवासी आश्रमशाळेत पाचशे ते सहाशे मुलांसाठी वर्षाला १४ ते १५ ट्रक लाकूड लागते. येथील चुलींची कार्यक्षमता दहा ते पंधरा टक्के इतकीच असते. हे एवढ्यावरच थांबत नाही तर ८५ ते ९० टक्के उष्णताही वाया जाते. धुरामुळे डोळे आणि छातीचे आजारही होतात. मात्र ‘आरती’च्या तंत्रज्ञांनी त्यावर मात करत ऊर्जाक्रांतीचा नवा पर्याय दिला आणि तो यशस्वीही करून दाखविला. चुलींची कार्यक्षमता ३५ टक्के करण्याबरोबरच वर्षाकाठीचे कोट्यवधींचे इंधन वाचविले आहे. याच्या जोडीला वेळेची बचत आणि वाया जाणारी उष्णता वाचली. गेल्या काही वर्षातील वृक्षसंपदा बचतीचा आकडा कोटीत जातो.

‘आरती’चे वरिष्ठ संशोधक आर. एम. साळुंखे म्हणाले, ‘६० ते ७० टक्के इंधनबचत ‘कम्युनिटी कूक स्टोव्ह’मुळे होते. धुरविरहित किचन, चुलीवर स्वयंपाक करताना धग लागते. यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो. असताना धग लागत नाही. उष्णता लागत नाही. भांडीही काळी होत नाहीत.’

## स्वच्छ इंधन...

पारंपरिक चुली आणि इंधनापासून निर्माण होणाऱ्या धुरांमुळे मोठ्या प्रमाणात वायूप्रदूषण होते. त्यावर विचार करून ‘आरती’ने सुधारित स्वयंपाक साधने आणि स्वच्छ जैव इंधने तयार करण्याबरोबरच ती विकसितही केली.



चपाती-भाकरी चूल...

## काजवे जेव्हा सूर्य होतात....

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील रस्ता नसलेली माडप-ठाकूरवाडी येथील शंभर घरांची आदिवासी वस्ती स्वतःची वीज स्वतः तयार करते. ही सारी किमया आहे ती ‘आरती’चे अध्यक्ष आर. डी. हणबर-देशमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांची. वस्तीतील रस्ते संध्याकाळी उजळतात, घरांमध्ये सीफल लागतो आणि टीव्हीही सुरू असते. ‘आरती’ने येथे सुधारित चुली दिल्या आणि शंभर घरातून रोज चारशे ते पाचशे किलो जळण वाचू लागले. वाचलेल्या लाकडातूनच येथे ‘गॅसिफायर’ प्रकल्प उभा राहिला आणि बघता-बघता माडप-ठाकरवाडीत दिवे लागले. येथे निरगुडीवर गॅसिफायर सुरू असून आदिवासीही आनंदी आहेत.



आश्रमशाळांतील निर्धूर चूल...

> ग्रामीण भागात ६५ ते ७० टक्के ऊर्जा ही जैव आहे आणि आदिवासी भागात ती ९० टक्के आहे. महिलांचे काबाडकष्ट कमी करणे आणि पर्यावरणाला पूरक अशी उपकरणे म्हणून ‘आरती’ने चूल या विषयाला प्राधान्य दिले आणि आम्ही त्यात यशस्वी ठरलो.
>
> **- आर. डी. हणबर-देशमुख**, अध्यक्ष, आरती